स्थायी समिती

दाखल विषय – दि. १२/४/२०२१

विषय क्रमांक :– ३६ त्वर्य

मा.सौ.वर्षा तापकीर व मा.राहूल भंडारे यांचे दि. १२/४/२०२१ चे फेरविचाराचे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. ६१ दि. ५/४/२०२१ चा फेरविचार करण्यात यावा.

(Selection of Service Provider for Supply,Installation,Operation and Maintenance of Linear Accelerator with IGRT/IMRT/VMAT on Turnkey Basis. ( टेंडर क्रमांक २८ सन २०२०-२१) निविदा मागविल्या असता एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दर देणारे निविदाधारक वुई केअर हेल्थकेअर यांना पुणे महानगरपालिकेच्या स.नं. ५८५ मार्केटयार्ड, पुणे-३७ येथे पुणे मनपा बरोबर संयुक्त विदयमाने कर्करोग उपचारासाठी लिनिअर ॲक्सलेरेटर प्रकल्प उभारणेस व सदरचा प्रकल्प वुई केअर हेल्थकेअर यांना पुणे मनपा संयुक्त विदयमाने ३० वर्षे मुदतीच्या कराराने चालविणेस देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर पुढील कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत)

१. वुई केअर हेल्थकेअर स.नं.२४३,हिस्सा नंबर ६/६,पहिला मजला,अबोव्ह मान्यवर शोरूम, जुना पुणे मुंबई रोड,चिंचवड,पुणे-४११०१९ यांचेकडून पुणे महानगरपालिकेच्या स.नं.५८५ मार्केटयार्ड पुणे-३७ येथे पुणे मनपा बरोबर संयुक्त विदयमाने कर्करोग उपचारासाठी लिनिअर ॲक्सलेरेटर प्रकल्प उभारणेस व सदरचा प्रकल्प वुई केअर हेल्थकेअर यांना पुणे मनपा संयुक्त विदयमाने ३० वर्षे मुदतीच्या कराराने चालविणेस देणेस.

२. वुई केअर हेल्थकेअर स.नं.२४३,हिस्सा नंबर ६/६,पहिला मजला,अबोव्ह मान्यवर शोरूम, जुना पुणे मुंबई रोड,चिंचवड,पुणे-४११०१९ यांना रक्कम रूपये १४,८५,००,०००/- ( अक्षरी रक्कम रूपये चौदा कोटी पंच्याऐंशी लाख फक्त) इतकी रक्कम सदर प्रकल्पाकरीता पुणे मनपाचा हिस्सापोटी (Viability Gap Funding ) तातडीने अदा करणेस.

३. कर्करोग उपचारासाठी लिनिअर ॲक्सलेरेटर प्रकल्प उभारणे व चालविणेसाठी आवश्यक त्या सर्व परवानगी / मान्यता संबधित सक्षम विभागाकडून वुई केअर हेल्थकेअर यांनी पुणे महानगरपालिका यांचेवतीने घेणेस.

४.काही अपरिहार्य कारणास्तव प्रस्तावित केलेल्या जागेवर प्रकल्प उभारणीसाठी अडचणी उदभवल्यास प्रस्तुत प्रकल्पासाठी जागा बदल करण्याचे अधिकार व प्रकरणी आवश्यक तो करारनामा करणेस व त्यातील कलमे ठरविण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

४. वुई केअर हेल्थकेअर स.नं.२४३,हिस्सा नंबर ६/६,पहिला मजला,अबोव्ह मान्यवर शोरूम, जुना पुणे मुंबई रोड,चिंचवड,पुणे-४११०१९ यांचेकडून कर्करोग उपचारासाठी लिनिअर ॲक्सलेटेर प्रकल्प ३० तीस वर्षे सीजीएचएस दराने सेवा उपलब्ध करून देणेस व ३० तीस वर्षे मुदतीच्या कराराने चालविण्याकरीता आवश्यक तो करारनामा करणेस व सदर करारातील कुठल्याही बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

विषय क्रमांक :– ३७ त्वर्य

मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/०६ दि. १२/४/२०२१ चे पत्र.

कोरोना ग्रस्तांवर (Covid-19) या साथीच्या रोगाच्या नियंत्रणाकरीता करावयाच्या उपाययोजनेच्या खर्चाकरीता र.रु. २५ कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रक, | | |
| १) CE17A242/SJ6-93 – भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय मान्य तरतूद र.रू.१४६ कोटी | १० कोटी | ---- |
| २) CE20D219/L2-11 –नदी पुनरूज्जीवन प्रकल्प राबविणे (PPP /कर्ज /अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे / सुधारणा करणे) मान्य तरतूद र.रू. १०५ कोटी | ५ कोटी | ---- |
| ३) CE20B102/T2-21 – Electronics Bus (GCCModel) / विकत /PPP इत्यादी धर्तीवर बस उपलब्ध करून देणे मान्य तरतूद र.रू. ३५ कोटी | १० कोटी | ---- |

| | | |
|---|---|---|
| नविन सुचवलेले काम<br>कोरोना ग्रस्तांवर (Covid-19) या साथीच्या रोगाच्या नियंत्रणाकरीता करावयाच्या उपाययोजनेच्या खर्चाकरीता | ---- | २५ कोटी |

विषय क्रमांक :– ३८ त्वर्य

पुणे शहरात दि.२५/९/२०१९ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे अंबिल ओढ्याला आलेल्या पुरामुळे फुलपाखरू उद्यान, सहकारनगर येथे नाला गार्डनसाठी करण्यात आलेला लोखंडी पुलाचा ई–लिलावातील पुलाची/मालाची डिलीव्हरी देणे कामी मा.स्थायी समितीतील खालील दोन सदस्यांच्या नावाचा समावेश करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/०७ दि. १२/४/२०२१ चे पत्र.

**१) मा.सौ.सुनिता गलांडे**

**२) मा.सौ.वर्षा तापकीर**

विषय क्रमांक :– ३९ त्वर्य

डेडीकेटेड कोविड हॉस्पीटल (डी.सी.एच.) बाणेर, पुणे व जम्बो कोविड हॉस्पिटल सीओईपी, शिवाजीनगर,पुणे येथील जम्बो कोव्हिड हॉस्पीटलमधील कोव्हिड १९ रूग्णांकरीता पुरविण्यात येणा–या औषधे,कन्ज्युमेबल, यांचा पुरवठा पुणे महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दराने नियुक्त केलेल्या वैद्यकीय सेवा व सुविधा पुरविणा–या डेडीकेटेड कोविड हॉस्पीटल (डी.सी.एच.) बाणेर, पुणे येथे आर.ए.एस.पी.एल. इमर्जन्सी सर्व्हिसेस या संस्थेस व जम्बो कोविड हॉस्पिटल सीओईपी,शिवाजीनगर, पुणे येथे सीओईपी जम्बो कोविड सेंटर इमर्जन्सी मेडिसिन सर्विसेस या संस्थेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये त्याची देयके सदर संस्थेस अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/०८ दि. १२/४/२०२१ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०–२१

आरई१७एफ२५७

COVID-19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :– ४० त्वर्य

कोव्हिड १९ उपाय योजनांसाठी पुणे मनपा विस्तारीत इमारतीमध्ये स्थापन केलेले केंद्रीय बेड व्यवस्थापन कक्ष नियोजन व नियत्रंण करणेकामी वाढीव बेड व्यवस्थापनचे काम मे.आय.हिल वेल ( इंडो हेल्थ सॉप्टवेअर सोल्युशन प्रा.लि.) यांचेकडून दरमहा रक्कम रूपये १५,५१,०००/- ( अक्षरी रक्कम रूपये पंधरा लाख एकावन्न हजार फक्त ) प्रमाणे कोव्हिडचा प्रार्दुभाव कमी होईपर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार करून घेणेस, त्यांच्यांशी आवश्यक तो करारनामा करणेस व खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/०९ दि. १२/४/२०२१ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१

RE17F259

कोव्हिड १९ अंतर्गत जम्बो हॉस्पिटलसाठी खर्च

मान्य तरतूद रक्कम रूपये ७५,००,००,०००/-

विषय क्रमांक :– ४१ त्वर्य

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता, मा.आबा बागुल व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १२/४/२०२१ चे पत्र.

कोविड–१९ च्या अनुषंगाने में केंद्र शासन, मे. राज्य शासन तसेच पुणे महानगरपालिका याचे वतीने, कोरोनाचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव होऊ नये व त्याचा प्रसार रोखण्याकरिता दि. १५ मार्च २०२० पासून अतिशय कडक प्रमाणात लॉकडाउन करणेत आला सदर लॉकडाउन अंतर्गत महानगरपालिकेची वाहनतळे बंद ठेवणेत आली होती. सदरचा 'लॉकडाऊन' साधारणपणे माहे सप्टेंबर २०२० पर्यत होता: लॉकडाऊन नंतर माहे ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२० च्या दरम्यान अंशतः प्रमाणात अनलॉकची प्रक्रिया सुरु करणेत आली त्या अंतर्गत बंद असणारी वाहनतळे त्यांच्या जागेवरील परिस्थितीनुसार पुनःश्च चालू करणेत आली.

सदरच्या एकूण कालावधीत शासकीय व निमशासकीय कार्यालये, कॉर्पोरेट कार्यालये, रेल्वे, एस.टी., पी.एम.पी.एम-एल, बसेस, हॉटेल, रेस्टॉरंट, विविध प्रकारची छोटी-मोठी दुकाने, नाट्यगृहे, सिनेमागृहे, उद्योग, व्यवसाय, व्यापार, शाळा, महाविद्यालये, उद्याने, दळण-वळणाची सर्व साधने, मोलमजुरी करणारे व इतर सर्व घटक यांचे क्रयशक्तीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम झालेला आहे. परिणाम स्वरूपः वाहनतळधारक यांचा व्यवसाय देखील पूर्वीच्या तुलनेत अल्पप्रमाणावर आलेला आहे. त्यामुळे वाहनतळधारकाना पूर्वी इतके भाडे भरणे शक्य होत नसलेची बाब लक्षात येत आहे व अशा परिस्थितीमध्ये भाडे आकारणी संदर्भात मानवी दृष्टिकोनातून नैसर्गिक न्यायतत्वाला अनुसरून योग्य त्या व्यावहारीक पातळीवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. तसेच सदय स्थितीत माहे फेब्रुवारी २०२१ पासून कोविड- १९च्या विषाणूंची तिव्रता पुनःश्च वाढलेली असून अनेक प्रकारचे कडक निर्बंध लागू करणेत आलेले आहेत व कोविड-१९ ची ही परिस्थिती पुढील किती कालावधीपर्यंत असू शकेन याबाबत कोणतेही भाकीत अथवा अंदाज़ वर्तवता येऊ शकत नाही.

सबब, नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून व मानवी दृष्टिकोनातून वाहनतळधारक यांना विशेष बाब म्हणून या संकट काळात त्यांचे भाडे रकमेमध्ये सवलत देणे आवश्यक असलेने, पुढील बाबीस मान्यता देण्यात यावी,

१) वाहनतळधारक यांचे दि. १५ मार्च २०२० पासून ते पुढील बंद असलेल्या कालावधीपर्यंतचे भाडे पूर्णतः (१००%) माफ करणेस.

२) भारतीय रेल्वे विभाग ऑर्डर क्र. PA/C/COVID-19 / RESUMTION TRAIN SERVICES /20 DATED 1-10-2020 नुसार त्यांचेकडील वाहनतळ धारकांना भाडे रकमेमध्ये ९०% सवलत देऊन १०% भाडे रक्कम आकारणी केली आहे. त्या धर्तीवर पुणे मनपाची वाहनतळे पुनःश्च कार्यसंचलीत करणेत आलेपासून कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली परिस्थिती पूर्वपदावर येईपर्यंत वाहनतळधारक यांचे भाडे रकमेमध्ये ९०% सवलत देऊन १०% भाडेरक्कम आकारणी करणेस,

३) पुनःश्च लॉकडाउन झाले नंतर वाहनतळे बंद झालेंस, त्या बंद कालावधीतील भाडे शुल्क पूर्णतः (१००%) माफकरणेस.

४) सदर कालावधीत ज्यांच्या मुदती संपुष्टात आलेल्या आहेत त्यांना मुदतवाढ देणेस

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.